**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1758/2007.**

श्री अरविंद दशरथजी वाटकर
वार्ड क्र. 1, मु.पो.ता. नागभिड, जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री व्ही. व्ही. दमके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती नागभिड जि. चंद्रपूर
2) श्री एस. एल. प्रधान
जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्राम पंचायत नागभिड जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.7.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.9.2006 रोजी व 21.11.2006 रोजी सचिव ग्राम पंचायत नागभिड यांचेकडे माहिती अधिकारी त्यांच्या दि. 22.4.2002, 14.2.2006 च्या पानठेला

हटविण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल. माहितीचा कालावधी एप्रिल 2002 ते सप्टे. 2006. 1) वरील दोन्ही अर्जावर काय कार्यवाही केली याची फाईल नोटींग देण्यात यावी. 2) तो पानठेला हटविण्यात आला किंवा नाही ते कळवावे. 3) तो पानठेला का हटविला नाही याची सविस्तर कारणे द्यावी. माहिती व्यक्तिशः देण्यात यावी असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 14.10.2006 रोजी ग्राम विकास अधिकारी तथा माहिती अधिकारी ग्राम पंचायत नागभिड सदर पानठेला अतिक्रमणाची बाब 6 महिन्याचे वर येत असल्यामुळे अशा प्रकारचे अतिक्रमण हटविण्याचे अधिकार ग्राम पंचायतला नाही. मुंबई ग्राम पंचायत अधिनियम कायदा कलम 53 (2) अन्वयेच्या कायद्यात 6 महिन्याचे वरील अतिक्रमण/अडथळा हटविण्याचे अधिकार ग्रामपंचायतीला प्राप्त झाल्याचे कायद्यात तरतुद झालेली आहे. परंतू त्याबाबतीचा शासकीय जी. आर. ग्रामपंचायतीला अजून पर्यंत प्राप्त झालेला नाही. जी. आर. प्राप्त होताच नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल. कृपया नोंद घ्यावी. सहपत्र ग्रामपंचायतीने केलेल्या कार्यवाहीची सत्यप्रत जोडण्यात आलेली आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 30.12.2006 रोजी प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती नागभिड यांनी सरपंच, सचिव ग्रामपंचायत नागभिड यांना मुं. ग्रा. पं. अधि. 1958 चे कलम 53 पोट कलम 2 (अ) नुसार सहा महिन्याच्या वरील अतिक्रमण काढण्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांची परवानगी घेवून किंवा त्यांचे वतीने अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करायला पाहिजे होती. परंतु आपण तसे केलेले दिसून येत नाही. सबब सदर अतिक्रमण काढण्यासाठी मु. ग्रा. पं. अधि. 1958 चे कलम 53 पोट कलम 2 (अ) नुसार कार्यवाही करण्यात यावी व संबंधिताना न्याय देण्यात यावा असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांनी पुन्हा शासकीय माहिती अधिकारी पंचायत उपविभाग जिल्हा परिषद

चंद्रपूर यांचेकडे दि. 31.1.2007 रोजी केलेला दिसतो. त्याचे उत्तर दि. 3.2.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी पंचायत उपविभाग जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी त्यांना दिलेले दिसून येते. मागितलेली माहिती ग्राम पंचायत व पंचायत समिती स्तरावर असल्यामुळे सदरची माहिती मिळण्यास्तव आपण कृपया ग्राम पंचायत व पंचायत समिती स्तरावर संपर्क साधावा व सदरची माहिती घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दाखल केलेले द्वतीय अपील हे त्यांना प्रथम अपीलाचा निर्णय दि. 18.1.2007 रोजी मिळाल्यानंतर 90 दिवसाचे कालावधीपेक्षा जास्त कालावधीनी दाखल केलेले आहे. त्यामुळे सकृतदर्शनी विलंबाने दाखल केलेले द्वतीय अपील हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे फेटाळण्यास पात्र आहे.

4. असे असले तरी वर नमुद केलेल्या वस्तुस्थितीवरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांना दि. 14.10.2006 रोजी अतिक्रमणाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यातही अतिक्रमण कोणत्या अधिनियमाच्या कोणत्या तरतुदीप्रमाणे काढण्याची तरतुद आहे तेही कळविलेले आहे. असे असुन सुध्दा दोनदा दिशाभूल करणारी माहिती देवून अतिक्रमणधारकाला संरक्षण दिलेले या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. यावरुन अपीलकर्ता यांनी माहिती मिळाली तरी शासकीय कार्यालयांना त्रास देण्याचे उद्येशाने पुन्हा पुन्हा अर्ज करण्याची सवयी मात्र जात नाहीत असेच दिसते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये अभिलेख, दस्तऐवज, कागदपत्रे इत्यादीच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असते त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित आहे. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना ग्रामपंचायतच्या ठरावाची छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. याचा अर्थ विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा ग्रामपंचायत सचिव यांनी गट विकास

अधिकारी यांचकडे दि. 20.1.2007 रोजी अहवाल पाठविलेला दिसून येतो व त्या अहवालाची प्रतिलिपी ही अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. त्यावरुनही कार्यवाही पूर्ण केलेली आहे व त्याबाबतची माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. कोणत्याही प्रकरणात निर्णय प्रक्रियेच्या गुणवत्तेच्या संदर्भात कारवाई करणे हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांच्या दि. 15.9.2006 च्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 14.10.2006 रोजी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 16.7.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.